

**KALEIDOSCOPE**

## 12th to 13th October, 2019

## State level two days

# GPAT workshop








लोकमत

जीपॅट कार्यशाळेचे मार्गदर्शक प्रा. रोहन पवार यांचे संजीव देसाई यांनी स्वागत केले. यावेळी विजय जगताप व इतर मान्यवर उपस्थित होते.

## ‘जीपॅट’ कार्यशाळेला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**सावंतवाडी** : येथील यशवंतराव भोसले कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये दोन दिवसीय ‘जीपॅट’ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. बी. फार्मसी अभ्यासक्रमानंतर एम. फार्मसी या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी जीपॅट परीक्षा अनिवार्य आहे. या कार्यशाळेत एकूण ११० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

ही परीक्षा केंद्र शासनाच्या नॅशनल टेस्टींग एजन्सीद्वारे आयोजित केली जाते. विद्यार्थ्यांना या परीक्षेविषयी सखोल माहिती व्हावी, याकरीता स्पेक्ट्रम ॲकॅडमी, नाशिक यांच्या सहकार्याने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. रोहन पवार, प्रा. सचिन कुशारे, डॉ. संतोष छाजेड उपस्थित होते. जीपॅट परीक्षेचे स्वरुप, त्याची तयारी व कोणत्या विषयावर जास्त लक्ष केंद्रित करावे, अशा अनेक विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

अभ्यासात सातत्य ठेवल्यास जीपॅट परीक्षा निश्चितपणे चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होता येते, असा विश्वास प्रा. पवार यांनी समारोपप्रसंगी व्यक्त केला. यावेळी संस्थेचे सचिव संजीव देसाई, प्राचार्य डॉ. विजय जगताप उपस्थित होते. कार्यशाळेचे नियोजन प्रा. विनोद मुळे यांनी केले.

Hello Sindhudurg
Page No. 3 Oct 20, 2019
Powered by: erelego.com

Two days GPAT workshop was organized at Yashwantrao Bhonsale College of Pharmacy, Sawantwadi in collaboration with spectrum academy, Nasik on 12th & 13th October, 2019. Total 110 students were participated for this workshop. The expert speakers from spectrum academy Mr. Rohan Pawar, Mr. Sachin Kushare & Dr. Santosh Chhajed given the highlights on GPAT examination & its preparation.